# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26




# पारंपारिक खेळांचे पुनर्जीवन काळाची गरज

## प्राचार्य डॉ. व्यंकटेश वांगवाड यांचे प्रतिपादन

**पाटण/प्रकाश कांबळे:-**

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये 'भारतीय पारंपारिक खेळ आणि शारीरिक शिक्षणातील मनोरंजक उपक्रम' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स (मल्टी-स्टेट) गडहिंग्लज आणि वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रभारी प्राचार्य प्रा. (डॉ). व्ही.ए.कळंत्रे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी चर्चासत्राच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट करत पाहुण्यांचे स्वागत केले.चर्चासत्राचे उद्घाटन प्राचार्य डॉ. व्यंकटेश वांगवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना डॉ. वांगवाड यांनी पारंपारिक खेळ आणि मानवी आरोग्य यांच्यातील अतूट नात्यावर प्रकाश टाकला. टेनिस व्हॉलीबॉल खेळाचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. वांगवाड यांनी आधुनिक काळात मैदानी खेळांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पारंपारिक खेळ आरोग्याची गुरुकिल्ली आहे असे मत व्यक्त केले.

उद्घाटन सत्राचे अध्यक्ष कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळांचे महत्त्व किती मोठे आहे, यावर सविस्तर चर्चा केली. भारतीय पारंपारिक खेळ शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक चपळता, सांघिक भावना आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. कबड्डी, खो-खो, लंगडी यांसारखे खेळ सहजरित्या खेळले जातात, जे तणाव कमी करतात ज्याची आज विद्यार्थ्यांना आवश्यकता आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. बीजभाषण डॉ सिंकु कुमार सिंग, नांदेड यांनी केले.

प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. प्रशांत पाटील, डॉ.महेंद्र कदम-पाटील डॉ. सॅम ब्रॅगेन्झ, आय. क्यू. ए.सी. समन्वयक प्रा.डॉ.सौ. हेमलता काटे उपस्थित होते.

चर्चासत्राचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ. दीपक पाटील - डांगे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले. तर सूत्रसंचालन डॉ. श्रीनिवास पवार व प्रा.कु.माथने यांनी केले. सदर चर्चासत्रासाठी जवळपास २६० प्राध्यापकांनी नाव नोंदणी केली होती. या दोन दिवसीय परिषदेत विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक आणि खेळाडूंनी सहभाग नोंदविला.